सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे **"४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत उदिष्ट व साध्य व त्याअनुषंगाने सन २०१८ मधील वृक्ष लागवडीबाबत नियोजन व पूर्वतयारी"** या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५१/१६/आस्था-२, दिनांक २१.८.२०१७ ची प्रत सोबत जोडत आहे.

— . — . — . — . — . — . —

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१७/शा२१२९
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 22 SEP 2017

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

क्र. तंशिसं/विकाना/वृक्षलागवड/2017/ 2810
दिनांक : 6 OCT 2017

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

वरील शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावे.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत उदिष्ट व साध्य व त्याअनुषंगाने सन २०१८ मधील वृक्ष लागवडीबाबत नियोजन व पूर्वतयारी ...

पत्र प्राप्त झाले
22 .. 2017
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५१/१६/आस्था-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१७.

तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
आवक क्र. शा. २९२८
दिनांक २८/०८/२०१७
१६

वाचा : १) शासनाचे समक्रमांकाचे दि.२७ एप्रिल,२०१६ चे परिपत्रक.
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.२१ नोव्हेंबर,२०१६ चे परिपत्रक.

परिपत्रक :-

हरित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणे आणि राज्याचे वृक्षाच्छादन २० टक्के वरुन ३३ टक्के पर्यंत नेण्याचा भाग म्हणून येत्या ३ वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचा शासनाने निर्धार केला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या कार्यालये, विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था इत्यादी ठिकाणी वृक्ष लागवड करणे शक्य आहे. यासंदर्भात संदर्भाधीन परिपत्रकान्वये सविस्तर सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. पर्यावरण संतुलित आणि हिरवाईने समृध्द महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि त्यातून दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष यावर मात करण्यासाठी एकत्रितपणे आणि एकजिनसीपणाने काम करुन वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागास सन २०१७-१८ या वर्षासाठी निर्धारित करण्यात आलेल्या एकूण १,८७,५०० इतक्या वृक्ष लागवडीपैकी प्रत्यक्षात ५१,५८० वृक्षांची लागवड करण्यात आली. विभागास दिलेल्या उदिष्टानुसार वृक्ष लागवडीची साध्य टक्केवारी २७.३० टक्के आहे. सन २०१८ मध्ये ६.२५ लाख वृक्ष लागवडीचे ठरवून देण्यात आलेले उदिष्ट पूर्णपणे साध्य होण्याच्या दृष्टीने आपण आतापासूनच आवश्यक ती तयारी करावी. तसेच विभागाचे वृक्षारोपणातील योगदान योग्य पद्धतीने प्रतिबिंबीत होण्यासाठी वन विभागाच्या संकेतस्थळावर दिलेल्या विहित कालमर्यादेत आवश्यक माहिती भरण्याची दक्षता घ्यावी.

वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचा सूक्ष्म आराखडा तयार करणे, त्या त्या वर्षातील वृक्ष लागवडीसाठी वृक्षांची निवड करुन अक्षांश व रेखांशासह सुयोग्य स्थळांची निश्चिती करणे, निकषाप्रमाणे खड्डे तयार करणे, जून-जुलै मधील वृक्ष लागवड, वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अहवाल (Real Time Reporting) आणि अंतिमतः संगोपन या विषयी शासन निर्णयात विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे दिलेल्या कालमर्यादेत कार्यवाही करावी. तसेच ह्याबाबतची माहिती विहित विवरणपत्रात प्रधान मुख्य संरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर व सचिव (वने) यांना पाठविण्यात यावी. तसेच अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाची माहिती स्वतंत्रपणे पाठवावी.

वृक्षारोपणाचा दृश्य परिणाम दिसून येण्यासाठी, संवर्धन, पाणीपुरवठा, जनावरांपासून रोपांचे संरक्षणासाठी जैविक किंवा तारांचे /प्लॅस्टीक कुंपण, कायम स्वरुपी देखभाल, निगा, जोपासना व संगोपन इत्यादी कामांचा नियोजन आराखडा तयार करावा व त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच या वृक्षाचे जिवंत राहण्याचे प्रमाण (Survival rate) किमान ८० टक्के ते ९० टक्के राहणेबाबत काळजी घ्यावी.

या कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. तसेच आवश्यक तेथे सी.एस.आर.फंडातून तरतूद उपलब्ध करुन घ्यावी. जिथे निधीची अडचण असेल त्या ठिकाणी वन व सामाजिक वनीकरण विभागामार्फत मोफत रोपे देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याबाबतची आवश्यक ती नोंद आणि लेखा इत्यादीबाबत रोपे उपलब्ध करुन घेणारा विभाग व रोपे उपलब्ध करुन देणारा विभाग अशा दोन्ही विभागांमार्फत ठेवण्यात यावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०८२११२४४१०४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P. M Takate

Digitally signed by P M Takate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cbc81d3569a4d80b2e2d776cce4c4a214d2cfe7877838548141, 3a4fa7c83b16b, cn=P M Takate
Date: 2017.08.21 15:36:21 +05'30'

( पा.म.ताकटे )

उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे स्वीय सहाय्यक,

२) सहसचिव (विद्यापीठ शिक्षण),उप सचिव (महाविद्यालयीन शिक्षण /तंत्रशिक्षण / कला /ग्रंथालये ) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

३) कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / महाविद्यालय प्रमुख यांना शासन परिपत्रकाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

४) संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण /कला /ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / महाविद्यालय प्रमुख यांना शासन परिपत्रकाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

५) निवडनस्ती / आस्था-२.

*************